श्री. परमसिंग रामसिंग राठोड, सहायक लेखा अधिकारी यांना लेखा अधिकारी संवर्गात तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नतीने सुधारीत पदस्थापना देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग,**
शासन आदेश, क्रमांक :-संलेको २०२२/प्र.क्र.१३३/कोषा. प्रशा.२
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक :- १३.०४.२०२३.

संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-
13 APR 2023
प्राप्त झाले सही........................

संदर्भ :- १) शासन आदेश क्रमांक संलेको-२०२२/प्र.क्र.१३३/कोषा.प्रशा.२ दिनांक २८.०२.२०२३.

## शासन आदेश

जिल्हा परिषद जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग-३) सेवेतील श्री. परमसिंग रामसिंग राठोड, सहायक लेखा अधिकारी यांना महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, लेखा अधिकारी संवर्गात, पदाचा कार्यभार स्विकारतील त्या दिनांकापासून संदर्भाधिन आदेश दि.२८.०२.२०२३ अन्वये तात्पूरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात आली आहे. सदर आदेशात अंशत: बदल करुन श्री. परमसिंग रामसिंग राठोड यांना वाटप करण्यात आलेल्या औरंगाबाद महसूल विभागांतर्गत स्तंभ क्र. ३ मधील नमूद केलेल्या पदावर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नतीने सुधारीत पदस्थापना संदर्भाधिन शासन आदेश दि. २८.०२.२०२३ मधील अटींच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | तात्पुरत्या पदोन्नतीने सुधारीत पदस्थापना |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | श्री. परमसिंग रामसिंग राठोड | अप्पर कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, जालना. |

२. श्री. परमसिंग रामसिंग राठोड यांनी आपल्या पदोन्नत पदाचा कार्यभार त्वरीत स्वीकारावा व तसे केल्याबद्दल कार्यभार हस्तांतरण प्रमाणपत्र या विभागाकडे पाठवावे. पदोन्नतीने नियुक्ती न स्विकारल्यास पदोन्नतीचे आदेश रद्द करण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(ता. र. पवार)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत,
१) महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर*.
२) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई.
३) संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई *
४) मा.उपमुख्यमंत्री यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) संबंधित अधिकारी *
६) संबंधित अधिकारी यांचे सध्याचे कार्यालय प्रमुख.*
७) संबंधित अधिकारी यांचे पदोन्नतीच्या पदाचे कार्यालय प्रमुख*.
८) अप्पर मुख्य सचिव (ले. व को.) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
९) निवड नस्ती कोषा.प्रशा.२, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
*(संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांचेमार्फत)

18/4

49/2023/724
17/4